# राष्ट्रीयकृत बँकेची समन्वयक यंत्रणा म्हणून नियुक्ती करिता Request for Proposal बाबतची सुचना

## कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडाचा घटक)

गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे (पू),

मुंबई - ४०० ०५१

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत विविध योजनांतर्गत तयार होणा-या सदनिकांचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन वितरण करण्यात येते, सदर वितरण कार्यात अर्जदारांकडून ऑन लाईन पेमेंट स्विकारण्यासाठी पेमेंट गेटवे सुविधा उपलब्ध करुन देणे, सोडतीमधील अयशस्वी अर्जदारांना अनामत रकमेचा परतावा करणे इत्यादी अनुषंगीक कामे विविध टप्प्यांवर विहित कालमर्यादेत करावी लागतात. पात्र लाभार्थ्यांकडून विक्री किंमत / प्रलंबीत व्याजाचा भरणा करणे व मंडळास आवश्यक अहवाल वेळोवेळी पाठवणे इ. महत्वाची कामे बॅकेस करावी लागतात. सोडतीपूर्वी व सोडती पाश्चात अर्जदारांना सोडतीसंबंधित रक्कम अदायगी करताना येणा-या अडचणी सोडविण्याकरिता बँकेने पूर्ण वेळ प्रतिनिधी कोकण मंडळास उपलब्ध करुन देण्याकरिता समन्वयक यंत्रणा (Co-ordinating Agency) म्हणून राष्ट्रीयकृत बँकेची नियुक्ती करावयाची आहे. या करिता राष्ट्रीयकृत बॅंकाकडून या सूचनेव्दारे Request for proposal मागविण्यात येत आहेत. उत्सुक बॅंकांनी कामकाजाचा सविस्तर तपशिल, अटी व शर्ती, प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप यासंबंधी सविस्तर माहितीसाठी मुख्य लेखा अधिकारी /कोंकण मंडळ यांचे कार्यालय, खोली क्र. १६८, पोट मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१, येथे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत संपर्क साधावा.

१. RFP ची प्रत दि.२३ .०८.२०२३ पासून https://www.mhada.gov.in/en/tenders या संकेतस्थळावर Tender Notice मध्ये pdf Format मध्ये उपलब्ध आहे. सदर RFP Documents ची print घेऊन नमूद सुचनांनुसार कार्यवाही करावी.

२. सील बंद RFP सोबत अनामत रक्कम रु.१,००,०००/- (रु.एक लक्ष) "Chief Account Officer KHADB"या नावाने मुंबई शाखेवर देय असलेल्या राष्ट्रीयकृत / शेडयुल्ड बॅंकेचा डी डी / पे-ऑर्डर स्वरुपात भरावी.

३. **RFP स्विकृती, RFP उघडण्याचे वेळापत्रक व स्थळ :**

| तपशिल | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| RFP स्विकृती | २३/०८/२०२३ ते २९/०८/२०२३ | सकाळी ११:०० ते सायं ४:०० | मुख्य लेखा अधिकारी / कोंकण मंडळ यांचे कार्यालय खोली क्र. १६८, पोट मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१ |
| RFP उघडणे | २९/०८/२०२३ | सायं ५:०० वाजता | |

४. RFP चे मुल्यमापन करुन स्विकृतीबाबतचा निर्णय दि.२९-०८-२०२३ रोजी सायं ६:०० पर्यंत देण्यात येईल, अथवा दि.३०-०८-२०२३ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत जाहीर करण्यात येईल.

५. यशस्वी बँकेस करारपत्र करतेवेळी सुरक्षा रक्कम रु.५,००,०००/- (रु.पाच लक्ष) जमा करणे बंधनकारक राहील.

६. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

स्थळ :-

दिनांक :-

स्वाक्षरीत/-
मुख्य लेखा अधिकारी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई